## *सातारा जिल्हा परिषद, सातारा*

## अनुकंपा नियुक्ती आदेश

**वाचा** -: 1. महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा(सेवाप्रवेश) नियम 1967 मधील नियम 5 चे परिशिष्ट 9(5)

2. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक अकंपा-1093/2335/प्र.क्र.90/93/आठ दि. 26.10.1994
3. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1095-2335/प्र.क्र.34-अ/आठ दि.23.8.1996, दि.11.9.1996
4. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1096/प्र.क्र.67/96/आठ दि.20.12.1996
5. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1097/प्र.क्र.32/आठ दि.8.9.1997
6. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1098/प्र.क्र.5/आठ दि.10.3.1998
7. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1000/प्र.क्र.20/2000/आठ दि.28.3.2001
8. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1000/प्र.क्र.5/2001/आठ दि.2.5.2001
9. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1000/प्र.क्र.59/2000 आठ दि.24.9.2001
10. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1004/प्र.क्र.51/2004/आठ दि.22.8.2005
11. शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.अकंवस-1005/126/सेवा-4 दि.31.10.2005
12. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1006/प्र.क्र.174/06/आठ दि.17.7.2007
13. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1007/प्र.क्र.181/07/आठ दि.1.8.2008
14. शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1010/प्र.क्र.244/आठ दि.13.10.2010
15. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1010/प्र.क्र.308/10/आठ दि.6.12.2010
16. शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.पदनि-2012/प्र.क्र.15/12/वित्तीय सुधारणा-1 दि.22.3.2012
17. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1013/प्र.क्र.8/आठ दि.26.2.2013
18. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-1014/प्र.क्र.34/आठ दि.1.3.2014
19. शासन पत्र कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग मुंबई यांच्याकडील क्र.अकंपा-2014/प्र.क्र.495/आस्था-9 दि.31 जुलै 2015.
20. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा-1014/प्र.क्र.155/आठ,दि. 17 नोव्हेंबर 2016.
21. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा 1217/प्र.क्र.102/आठ,दि. 21 सप्टेंबर 2017.
22. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा-1219/प्र.क्र.56/आठ,दि.11 सप्टेंबर 2019.
23. शासन निर्णय,वित्त विभाग क्र.अर्थसं2020/प्र. क्र.64/अर्थ-3,दिनांक 4 मे 2020.
24. शासन पत्र,ग्राम विकास विभाग,क्र.संकिर्ण2018/प्र.क्र.173/आस्था-8,दिनांक 24 ऑगष्ट 2020.
25. शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:अकंपा-1220/प्र.क्र.167/का-8,दिनांक 06 जानेवारी 2021.
26. शासन पत्र,ग्राम विकास विभाग क्र.आजिपं-2020/प्र.क्र.108/आस्था-8,दिनांक 04.02.2021.
27. शासन निर्णय वित्त विभाग,क्र.रानियो-2022/प्र.क्र.34/सेवा-4 दिनांक.31 मार्च 2023.
28. मान्य व मंजुर टिपणी दि. १० / ०८ /2023.

---

## आदेश

जा.क्र.साप्रवि/आस्था-1(1)/१८८३-९३/2023<br>
सामान्य प्रशासन विभाग<br>
दिनांक -: १० /08/2023.

ज्या अर्थी संदर्भ क्रमांक 2 अन्वये शासन सेवेत असताना दिवंगत झालेल्या वर्ग-3 व वर्ग-4 मधील कर्मचा-यांच्या कुटुंबावर ओढवणा-या आपत्तीत कुटूंबियांना सहाय्य करण्याच्या उद्देशाने दिवंगत कर्मचा-याच्या पात्र नातेवाईकास अनुकंपा तत्वावर शासन सेवेमध्ये नियुक्ती देण्याची योजना सुधारित स्वरूपात सुरू करण्यात आलेली असून, अनुकंपा तत्वावर द्यावयाच्या नियुक्तीच्या अनुषंगाने शासन स्तरावरील संदर्भ 1 ते 27 नुसार केलेल्या नियमावलीतील अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास, गट-क अथवा गट-ड श्रेणीच्या सरळसेवेच्या पदावर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती देण्याची तरतूद आहे.

त्याअर्थी सातारा जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचा-याच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा प्रस्ताव पडताळणी अंती शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र असल्याने त्यांना प्रतिक्षासूचीतील जेष्ठतेनुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा(सेवाप्रवेश) नियम 1967 मधील परिशिष्ट 9(5) नुसार सातारा जिल्हा परिषद

सेवेतील खालील गट-ड या सरळसेवेच्या रिक्त पदावर सुधारित वेतन संरचना एस-1 : 15000-47600 रकाना क्रमांक 07 मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी परिचर या पदावर तात्पुरत्या स्वरूपात स्थानापन्न नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मयत कर्मचा-यांचे नाव व मृत्युवेळी कार्यरत पदनाम | नियुक्ती द्यावयाचे वारस अर्जदाराचे नाव व रकाना 2 मधील कर्मचा-यांशी नाते व पत्ता | नियुक्तीचे पदनाम (संवर्ग) | उमेदवारांचा मूळ जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | कै.श्री .अधिक मारुती देसाई,परिचर | श्रीम.माया अधिक देसाई,पत्नी, मु.पो.काळगार ता.पाटण जि.सातारा | परिचर | खुला | खुला |
| 2 | कै.श्री.दयानंद निवृत्ती कांबळे,उपशिक्षक | श्रीमती उषा दयानंद कांबळे, मु.पो.लोणंद, दृष्टीराज हाऊस, बाळासाहेबनगर, पुणे फलटण रोड ता.खंडाळा,जि.सातारा | परिचर | अनु.जाती | अनु.जाती |
| 3 | कै.श्री.नरेंद्र भिमराव कांबळे,स्विपर | श्रीम अर्चना नेरंद्र कांबळे,पत्नी मु पो निंभोरे ता फलटण | परिचर | अनु.जाती | अनु.जाती |
| 4 | कै.श्री.गोविंद भगवान यादव, परिचर | श्री अमोल गोविंद यादव,मुलगा मु पो खडाळा ता खडाळा | परिचर | अनु.जाती | अनु.जाती |
| 5 | कै.श्री.वसंत राज्या वसावे,उपशिक्षक | श्रीम शिल्पा वसंत वसावे,पत्नी मु.पो. मोलगी ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार | परिचर | अनु.जमाती | अनु.जमाती |
| 6 | कै.श्री.बापुराव ज्ञानु चव्हाण,उपशिक्षक | श्रीम उज्वला बापूराव चव्हाण,पत्नी मु.पो.गोंदवले बु माण | परिचर | वि.जा.अ. | वि.जा.अ. |
| 7 | कै.श्री.मोहन धोंडीराम सावंत.मैलकामगार | श्री राहुल मोहन सावंत, मुलगा मु पो चिखली ता कराड | परिचर | अनु.जाती | अनु.जाती |
| 8 | कै.श्री.विलास गोविंद भोईर,वरिष्ठ सहाय्यक | श्रीम रंजना विलास भोईर, पत्नी मु पो राजपुर ता.आंबेगाव जि पुणे | परिचर | अनु.जमाती | अनु.जमाती |
| 9 | कै.प्रशांत कांतिलाल काटवटे ,ग्रामसेवक | श्रीमती रेखा प्रशांत काटवटे, पत्नी, मु.पो.तारगाव,ता.कोरेगाव, जि.सातारा | परिचर | वि.मा.प्र. | वि.मा.प्र. |
| 10 | कै.श्री.पुनाजी किसन घोईरत,ग्रामसेवक | श्रीम.रोहिणी पुनाजी घोईरत,पत्नी,मु. पो. बोरघर (घोडेवाडी) ता.आंबेगांव जि.पुणे | परिचर | अनु.जमाती | अनु.जमाती |

**उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.**

1. सदर आदेश मिळाल्यापासुन 30 दिवसाचे आत पदस्थापनेच्या जागी उपस्थित व्हावे अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द समजण्यात येईल. उमेदवार जिल्हा अंतर्गत कोठेही बदलीस पात्र राहील.
2. पदस्थापनेच्या जागी रुजु होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
3. सदरची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना व कारण नमूद न करता जिल्हा परिषद सेवेतून कमी करण्याचा हक्क राखून ठेवलेला आहे. तसेच सदर नेमणूकीमुळे उमेदवारास यापुढे शासकीय नेमणूकीसाठी कोणताही हक्क प्रस्थापित करता येणार नाही.
4. जिल्हा परिषदेची सेवा सोडावयाचे असल्यास एक महिना पूर्वसूचना/नोटीस द्यावी लागेल किंवा एक महिन्याचा मूळ पगार जिल्हा निधीत जमा करुन राजीनामा मंजुर करवून घेणे आवश्यक राहील.
5. खात्याच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रशिक्षण घेता येणार नाही. तसेच वरिष्ठ कार्यालयाने वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.
6. उपस्थित होताना नियमानुसार विहित नमुन्यात लेखी करारपत्र (ॲग्रीमेंट) संबंधित अधिकारी/कार्यालय प्रमुखाकडे द्यावे लागेल.

7. महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम 11 परिशिष्ट 3 मध्ये नमूद केल्यानुसार सदर पदावर रूजू झालेल्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत जिल्हा शल्य चिकित्सक सातारा यांच्याकडील शारिरिकदृष्टया पात्रते संबंधीचे वैद्यकीय प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे.
8. सदर पदावर शासनाने निर्धारित केलेला कालावधी पूर्ण केल्याशिवाय अन्य जिल्हा परिषदेमध्ये बदलीने नेमणूक देण्यासाठी अर्ज करता येणार नाही.
9. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 14 अन्वये जिल्हा परिषद सेवेत असताना अगर रजेच्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा व्यवसाय,धंदा,अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.
10. उमेदवारास शासनाने परिचर या पदासाठी विहीत केलेले सर्व सेवा नियम बंधनकारक राहतील.
11. संबंधितानी नियुक्तीनंतर वाढीव शैक्षणिक पात्रता धारण/अर्हता केली तरी त्याचा शासनाचे आदेश/मार्गदर्शन सूचना व नियमानुसारच वरिष्ठ पदावरील नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.
12. शासनाचे जिल्हा परिषदेचे वेळोवेळीचे आदेश/सुचना/नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
13. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.बीसी 2011/प्र.क्र.1064/2011,दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित झालेल्या जागेवर झाली व ज्यांच्या जातीच्या दाव्याची पडताळणी झालेली नाही,अशा उमेदवारास त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नेमणूक देण्यात आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे बंधनकारक राहील. नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करणेसाठीचा प्रस्ताव नियुक्ती प्राधिका-यामार्फत जात पडताळणी समितीकडे सादर करणे बंधनकारक राहील. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर सदरचा नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल. अशा उमेदवाराविरूध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग(जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील नियम 10 अन्वये कार्यवाही करण्यात येईल.
14. महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम 1967 मधील नियम 6(5) नुसार सदर पदावर परिविक्षाधिन कालावधी एक वर्षाचा असेल, परंतु संबंधित उमेदवाराचे काम सदर परिविक्षाधीन कालावधीत आवश्यक त्या दर्जाचे नाही असे आढळून आल्यास परिविक्षाधिन अवधी वाढविण्यात येईल. व परिविक्षाधिन कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केल्यानंतर व तद्नंतर तीन वर्षे सलग सेवा पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषद स्थायी कर्मचारी समजण्यास पात्र राहील.
15. संबंधितास सदर पदावर देण्यात येणारी नियुक्ती शासन पत्र दि. 21.7.2000 अन्वये जेष्ठतेनुसार आणि रिक्त पदावर असुन ते स्वीकारणे बंधनकारक आहे. सध्याची नेमणुक नाकारल्यास त्यांची अनुकंपा तत्वावरील नेमणुक रद्द करण्यात येईल.
16. अविवाहित महिला उमेदवार/विधवा महिला यांचे बाबतीत त्यांनी विवाह/पुर्नविवाह केला नसल्याबाबत शपथपत्र उपस्थित होताना कार्यालय प्रमुख्याकडे देणे बंधनकारक राहील.
17. सदर अनुकंपा उमेदवारास मयत कर्मचा-यांचे कुटुंबातील इतर सदस्याचे पालन पोषण/ सांभाळ करणेबाबत शपथपत्र हजर होताना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील.
18. उमेदवारांची नियुक्ती जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधीन राहून करण्यात आलेली आहे. याबाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
19. संबंधितास शासन निर्णय,वित्त विभाग दि.31.10.2005 नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु राहील. तसेच सेवानिवृत्त अंशराशीकरण,भविष्य निर्वाह निधी इत्यादी संबंधित शासनाचे वेळोवेळीचे आदेश,निर्णय, परिपत्रके इत्यादीचे पालन करणे बंधनकारक राहील.
20. उमेदवारास महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक 28 मार्च 2001 मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
21. उमेदवाराने या कार्यालयास वारंवार सादर केलेली प्रतिज्ञापत्रे तसेच स्वयंघोषणापत्रांमधील माहिती खोटी आढळून आल्यास,भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार उमेदवारावर खटला भरला जाईल व त्यानुसार ते शिक्षेस पात्र राहतील. तसेच देण्यात आलेले सर्व लाभ काढून घेण्यात येतील.
22. अनुकंपा नियुक्तीकरिता सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधिताचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी / नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल. कोणतीही माहिती चुकीची / खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्ती कोणतेही कारण न देता रद्द करण्यात यईल.

23. उमेदवारास या आदेशान्वये दिलेली नेमणूक स्विकारणे बंधनकारक राहील. नेमणूक नाकारल्यास अथवा दिलेल्या नेमणूकीच्या आदेशात बदल करण्यासाठी वरिष्ठ पातळीवरून दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणूक) नियम 1967 मधील नियम6(5) चा भंग केला आहे असे समजून सदरच्या उमेदवारावर शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
24. परिशिष्ट क्र.21 मधील प्रचलित शासन निर्णयानुसार नियुक्तीच्या वेळी गट क मधील पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारास गट-क मधील पदाच्या उपलब्धते अभावी गट-ड पदावर नियुक्ती देणेत आलेली आहे. अशा अनुकंपा नियुक्तीधारकास भविष्यात गट-क मधील पद उपलब्धतेनुसार पदावर नियुक्ती देणेत येईल.
25. परिशिष्ट क्र.27 मधील प्रचलित शासन निर्णयानुसार संबधित कार्यालय प्रमुख यांनी शासन निर्णयातील तरतुदीनसुार नियुक्ती देणेत आलेल्या उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात प्रपत्र/विकल्प भरुण घेण्याची कार्यवाही करुन सदरबाबत मुळ सेवा पुस्तकात नोंद घेऊन एक प्रत सेवा पुस्तकास डकविण्यात यावी.

(ज्ञानेश्वर खिलारी) (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

प्रति,

संबधित उमेदवार ------

प्रत : माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

1. ------------------------------------------------------------------

2/- अनुकंपा तत्वावर नेमणूक दिलेल्या उमेदवाराच्या सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी करून रिक्त पदावर हजर करून घ्यावे. तसेच आदेशातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता विहित मुदतीत उमेदवाराकडून करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील. त्यानुसार पूर्तता करून अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा.
3. निवडनस्ती